# प्रिया गातसे आनंदी गान

धन्य धन्य आली सुवेळा ।  खास गोतावळा । जाहला गोळा । नाशिकला समारंभ आगळा । ९३ साली झाला वेगळा । प्रिया सांगते तुम्हा सगळा ॥धृ ॥

आधी नमू गणेश देवाला । माता रेणुकेला । सार्या पितराला । प्रल्हाअदराय आमचा पुरुष मूळ । उद्धरिल ज्यान सार कूळ । पुण्यस्मरणाची हीच वेळ ॥

चाल

गंगातीरावर गिरणार गावी । मंगेशाचा जन्म खरा ।

नाशिक शहरी गेल बालपण। संस्कार घडला खराखुरा ॥

पितृछत्र हरपले बालपणी। मामा करी सांभाअळ खरा ।

नाना कामे करूनी घातला। जगण्याचा आदर्श खरा ॥

शेंदुर्णीला होते सासर । वेदशास्त्र संपन्न महा ।

वासुदेवांची लोपमुद्रा । आजी लाभली आम्हा महा ॥

चाल

नाशिकचे जामखेडकर । तेव्हा झाले जळगावकर ॥

नावलौकिक मिळविला फार । कविभूषण झाले शाहीर ॥

चाल

संसार वृक्ष वाढला । चढ उतार आले वाट्याला । धीराने सामना केला । वटवृक्ष कुटुंबाचा बहरून गेला ॥

आक्का-काका आधार समद्याला । समाधाने आशीर्वाद देती आज आम्हाला ॥

चाल

आज जमला सारा गोतावळा । आनंदाचा क्षण आगळा ॥

मावशी आजी आली मुद्दाम । अण्णा आले काम सोडून ॥

भाई भाभी आव्याचे बर ।  श्रुती छेडती नाशिककर ॥

डॅडी माई मॅडम रामभाऊ । मामलेदारीण तसे मधुभाऊ ॥

मंदा आत्या मंगलाबाई । रजी आत्यास येण्याची घाई ॥

वहिनी आजी खास उपस्थित । झाले सारे सारे आनंदीत ॥

माझ्या भावाबहिणींची नाव । आहे तुम्हा सार्यांना ठाव ॥

चाल

तयारी केली जोरदार । पंगतीचा उडवला बार । सगळा शिस्तिचा कारभार । कार्यक्रम आखणीनुसार । जणू स्वर्ग अवतरे आजची भुमीवर ॥

मिळवणी

जमला जमला सारा परिवार । बहिणभाऊ बर । कार्यक्रम थोर । बाबांच्या एकषष्टीसाठी  । नाशकामध्यी झाली दाटी । आईच्या समाधान पोटी ॥

दीर्घायुष्य लाभो सार्यांना । थोरा मोठ्यांना । जामखेडकरांना । आम्हा सार्यांना पुरता अभिमान । कुळाची आम्ही वाढवू शान । प्रिया गातसे आनंदी गान ॥

नाशिक२६।१०।९३